दैनिक **वादळ वार्ता**
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक


vadalvartanews@gmail.com | संपादक : अजय भांगे | https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी • गुरुवार दि.२९ जानेवारी २०२६ • 9422660077 • आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ • वर्ष ३ रे • अंक १५४ • पाने ४ • किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi • Thursday 29 January 2026 • 9422660077 • RNI-MAHMAR / 2023 / 87555 • Year - 3rd • Issue 154 • Pages 4 • Rate 4 Rs

दैनिक वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
RNI/MAHMAR/2023/87555
॥ महाराष्ट्रभर प्रतिनिधी नेमणूक ॥
https://epaper.vadalvarta.com
महाराष्ट्रातील सर्व जिल्हे, तालुके, सर्कल व गावे येथे उत्साही, निर्भीड व समाजभान असलेले प्रतिनिधी नेमायचे आहेत.
पदे: जिल्हा प्रतिनिधी • तालुका प्रतिनिधी • सर्कल प्रतिनिधी • गाव प्रतिनिधी
पात्रता:
✔ पत्रकारितेची आवड व सामाजिक भान
✔ स्थानिक प्रश्न मांडण्याची क्षमता
✔ मोबाईल / डिजिटल माध्यमांचे ज्ञान
✔ बातमी लेखन व फोटो / व्हिडिओ पाठवण्याची तयारी
✔ अनुभव नसला तरी चालेल (नवीन उमेदवारांना संधी)
प्रतिनिधींना मिळणाऱ्या सुविधा:
दैनिक वादळ वार्ता ओळखपत्र • सामाजिक प्रश्नांना व्यासपीठ • बातम्या प्रसिद्ध करण्याची संधी • पत्रकारितेत नाव व ओळख • पुढील काळात विशेष संधी व जबाबदाऱ्या
विशेष सूचना: निर्भीड, अन्यायाविरोधात आवाज उठवणाऱ्यांना प्राधान्य • ग्रामीण व शहरी भागातील उमेदवारांचे स्वागत
मुख्य संपादक : अजय भांगे | संपर्क | मो.न.9422660077

# महाराष्ट्राच्या राजकारणातील धुरंधर लोकनेता हरपला



उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे बुधवारी निधन झाले. बुधवारी सकाळी ८:४५ वाजता बारामती विमानतळावर उतरताना त्यांचे चार्टर्ड विमान कोसळले. ते ६६ वर्षांचे होते. या अपघातात त्यांचे सुरक्षा रक्षक, दोन वैमानिक आणि एक महिला क्रू मेंबरसह पाच जणांचा मृत्यू झाला.त्यांचे पार्थिव अंत्यदर्शनासाठी विद्या प्रतिष्ठान येथे ठेवण्यात आले होते. येथे अंत्यदर्शनासाठी मोठा जनसमुदाय लोटला. यानंतर रात्री पुन्हा पार्थिव रुग्णालयात नेण्यात आले. उद्या सकाळी ११ वाजता अजितदादांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेतअजित पवार ५ फेब्रुवारी रोजी पुण्यात जिल्हा परिषद निवडणुकीसाठी चार सभांना संबोधित करणार होते. ते सकाळी ८:१० वाजता मुंबईहून निघाले. केंद्रीय विमान वाहतूक मंत्री राम मोहन नायडू यांनी सांगितले की, वैमानिकाने बारामती विमानतळावर उतरण्याचा प्रयत्न केला, परंतु धावपट्टी स्पष्ट दिसत नसल्याने त्यांनी विमान परत वर घेतले.पहिला प्रयत्न अयशस्वी झाल्यानंतर, बारामतीच्या धावपट्टी ११ वर उतरण्याचा दुसरा प्रयत्न करण्यात आला. विमान धावपट्टीच्या जवळ कोसळले आणि त्याला आग लागली. वैमानिकाने कोणतेही आपत्कालीन संकेत दिले नाहीत किंवा मेडे कॉलही केला नाही.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बारामतीत पोहोचले. त्यांनी आज शाळेला सुट्टी जाहीर केली आणि तीन दिवसांचा राज्य दुखवटा जाहीर केला. गुरुवारी सकाळी ११ वाजता बारामती येथे पवार यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार केले जातील. अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा, काका शरद पवार, दोन्ही मुले आणि बहीण सुप्रिया सुळे हे देखील बारामती येथे पोहोचले.दरम्यान, विमान अपघात तपास ब्युरो (एएआयबी) ने अपघाताची चौकशी सुरू केली आहे. तपास यंत्रणेचे एक पथक दिल्लीतील विमान संचालक व्हीएसआर व्हेंचर्सच्या कार्यालयात पोहोचले आहे. दुसरी टीम बारामतीला रवाना झाली आहे.दरम्यान, व्हीएसआर व्हेंचर्सने म्हटले आहे की पायलटला १६,००० तासांचा उड्डाणाचा अनुभव होता, तर सह-वैमानिकाला १,५०० तासांचा अनुभव होता. कंपनीने दावा केला आहे की विमानात कोणताही तांत्रिक बिघाड नव्हता.



## पंतप्रधान मोदींनी केलाशोक व्यक्त



श्री अजित पवार हे जनतेशी घट्ट नाते असलेले, तळागाळाशी मजबूत नाळ असलेले लोकनेते होते. महाराष्ट्रातील जनतेच्या सेवेत सदैव अग्रभागी राहणारे एक मेहनती व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांना व्यापक आदर होता. प्रशासकीय बाबींची त्यांना सखोल जाण होती. गरीब आणि वंचितांच्या सक्षमीकरणासाठीची त्यांची तळमळ विशेष उल्लेखनीय होती. त्यांचे अकाली निधन अत्यंत धक्कादायक व दु:खद आहे. त्यांच्या कुटुंबीयांप्रती आणि असंख्य चाहत्यांप्रती मन:पूर्वक शोकसंवेदना. ओम शांती.'

## मनाला चटका लावणारी घटना : मुख्यमंत्री फडणवीस



अजित पवार हे लोकनेते होते, महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्याची माहिती असलेला, महाराष्ट्रांच्या प्रश्नांची जाण असलेला नेते होते. त्यांच्याबद्दल जनसामान्यांमध्ये प्रचंड आस्था होती, सर्व परिस्थितीमध्ये न डगमगता पुढे जाणारं हे व्यक्तिमत्व होतं. महाराष्ट्राकरता आजचा दिवस कठीण आहे, दादांसारखं नेतृत्त्व तयार व्हायला अनेक वर्ष लागतात. ज्यावेळी महाराष्ट्राच्या विकासामध्ये महत्त्वपूर्ण देत होते अशा काळामध्ये त्यांचं निघून जाणे अविश्वसनीय आणि मनाला चटका लावणारं असल्याचं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

## मोठा भाऊ गमावल्याचे दु:ख : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे



कोणाच्या स्वप्नातही आलं नसेल की अजित दादा इतक्या लवकर आपल्यातून जातील. हे महाराष्ट्रासाठी अत्यंत दु:खद आणि दुर्दैवी आहे. अजित दादा गेले अनेक वर्ष राज्याच्या राजकारणाच नेतृत्व करत होते., अतिशय परखड, स्पष्टवक्तेपणा आणि प्रशासनावर असलेली त्यांची पकड आपण पहिली आहे. प्रत्येक गोष्टीचा बारीक अभ्यास करुन बोलण्याची सवय त्यांना होती. निर्भीड बोलणारे असले तरी सुद्धा, अतिशय मनाने निर्मळ होते, याचा अनुभव मी घेतला आहे. त्यांच्यासोबत मंत्रिमंडळातही काम केलं, मी मुख्यमंत्री असताना त्यांनी उपमुख्यमंत्री म्हणून काम केलं. योजना सुरु करताना आर्थिक तरतूद त्यांनी अतिशय उत्कृष्टपणे केली. त्याचा अनुभव मला आहे. एकदा ठरवलं की ते करायचेच. त्यांच्या जाण्याने फक्त पवार कुटुंबाचंच नाही तर संपूर्ण राज्याचं न भरुन निघणारं नुकसान झालं आहे. एका मोठा भाऊ गेल्याचं दु:ख माझ्या मनात आहे. मी त्यांना भावपूर्व आदरांजली अर्पण करतो. कुटुंबाला हे दु:ख सहन करण्याची शक्ती देवाने द्यावी.

## अजित दादांच्या जाण्याने मनाला चटका : ना. पंकजाताई मुंडे



दादा अशी शळीं घ्यायची नव्हती !!... तुम्ही जीवाला चटका लावून गेलातें... तुम्ही सदैव स्मरणात रहाल.. तुमच्याबरोबर प्रवास केला, चर्चा केल्या, अगदी गप्पाही खूप मारल्या.. तुमचा राजकिय आणि अकॅडमिक सेन्स खूप जबरदस्त होता. तुमच्या भाषणातून, विनोद बुद्धीने तुम्ही अनेकांना स्पष्ट बोलूनही हसवलं.. पण आज तुमच्या जाण्याने तुम्ही कार्यकर्त्यांना रडवलं.. असा अनुभवी नेता होणे नाही .. महाराष्ट्र एका डायनामिक नेत्याला मुकला.. गोपीनाथ मुंडे परिवारातर्फे आदरांजली, अशा शब्दांत पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग व पशुसंवर्धन विभागाच्या मंत्री पंकजा मुंडे यांनी श्रद्धांजली वाहिली.

## प्रशासनावर मजबूत पकड आणि वेळेची काटेकोर शिस्त ही अजित पवारांची ओळख होती - डॉ. नीलम गोऱ्हे



उपमुख्यमंत्री तथा ज्येष्ठ व लोकप्रिय नेते मा. अजितदादा पवार यांच्या आज सकाळी झालेल्या धक्कादायक निधनाने संपूर्ण महाराष्ट्रावर शोककळा पसरली आहे. हा विश्वास बसणार नाही असा क्षण असून राज्याने एक दूरदृष्टी असलेला नेतृत्वगुणी नेता गमावला आहे, असे विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी म्हटले आहे.डॉ. गोऱ्हे म्हणाल्या की, सलग सात वेळा विधानसभेवर निवडून आलेले अजित पवार हे प्रशासनावर मजबूत पकड, वेळेचे काटेकोर नियोजन आणि निर्णयक्षमतेसाठी ओळखले जात होते. कोरोना काळात त्यांनी सातत्याने आढावा बैठका घेऊन जनतेला दिलासा देणारे निर्णय घेतले. तसेच शाश्वत विकास उद्दिष्टांसाठीचा निधी संपूर्ण महाराष्ट्रासाठी राखीव ठेवण्याचा दूरगामी निर्णय त्यांच्या नेतृत्वाची दृष्टी दर्शवतो.विधानपरिषद उपसभापतीपदाच्या काळात विविध समित्या व सभागृहाच्या कामकाजात त्यांचे योगदान अत्यंत मोलाचे राहिले. त्यांच्या निधनामुळे सहकार, शेती व विकास क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली असल्याची भावना व्यक्त करत, डॉ. गोऱ्हे यांनी शिवसेनेच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.अजित पवार हे उत्तम संसदपटू होते आणि विधानपरिषदेत त्यांचे योगदान कायम स्मरणात राहील. त्यांच्या कुटुंबीयांना व सर्वांना हे दु:ख सहन करण्याची शक्ती ईश्वर देवो, अशी प्रार्थनाही त्यांनी केली.

## व्यापाऱ्यांचा कडकडीत बंद आणि शिवाजी महाराजांच्या पुतळ्या जवळ अजित दादांना सर्पक्षीय श्रद्धांजली

केज-राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या अकाली निधनाची माहिती होताच केज येथील व्यापाऱ्यांनी स्वयंस्फूर्तीने आपापली दुकाने व व्यवहार बंद करून अजित दादा पवार यांना श्रद्धांजली व्यक्त केली. तसेच केज येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्या जवळ सर्वपक्षीय कार्यकर्त्यांनी अजितदादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. त्या मध्ये राष्ट्रवादीचे नेते रमेशराव आडसकर, युवानेते ऋषिकेश आडसकर, नगराध्यक्षा सिताताई बनसोड, गटनेते हरून इनामदार, माजी जिल्हा.परिषद सदस्य किसनदादा कदम, नगरसेवक अझर इनामदार, सुनील हिरवे, सरपंच कैलास जाधव यांच्यासह राजकीय, सामाजिक, व्यापारी क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.



अजित दादा यांच्यावर काळाने झडप घातली आणि रांगडा आणि जमिनीशी नाळ जोडलेला हजारो कार्यकर्ते निर्माण करणाऱ्या कारखान्याचा मालक आज आपल्यातून निघून गेला आहे. अजित पवार यांना केज वासीय, नगरपंचाय आणि इनामदार परिवाराच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली.

-हारून इनामदार, (गटनेते नगरपंचायत केज)



अजितदादा पवार यांच्यासारख्या ढाण्या वाघावर काळाने झडप घातली आहे. कामाला महत्व देणारे आणि स्पष्ट व वक्तशीरपणा या बाबत दादांची ख्याती होती. त्यांना केज नगर पंचायतीच्या आणि नागरिकांच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली.

-सौ. सिताताई बनसोड,
(नगराध्यक्षा, केज)




अजितदादा पवार हे जिल्ह्याचे पालकमंत्री झाल्यामुळे जिल्ह्याचा विकास होऊन ऊसतोड मजुरांचा जिल्हा ही ओळख पुरसणार होती. मात्र काळाने घाला घालून अजित पवार यांना हिरावून नेले. त्यांना आमची भावपूर्ण श्रद्धांजली.

अझरोद्दीन इनामदार, (नगरसेवक तथा राष्ट्रवादी शहराध्यक्ष, केज)


## वडील नसल्याची जाणीव भासू दिली नाही-धनंजय मुंडे



महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विमान अपघातात निधन झाले आहे. या अनपेक्षित घटनेने संपूर्ण राज्यात हळहळ व्यक्त केली जात आहे. अजित दादांचे निकटवर्तीय समजले जाणारे आमदार धनंजय मुंडे यांना अश्रू अनावर झाल्याचे पाहायला मिळाले.धनंजय मुंडे गाडीत बसून कॉलवर बोलताना त्यांना शब्द फुटत नसल्याचे पाहायला मिळाले. माझ्या सारख्याल वडील नाहीत याची कधी जाणीव नाही होऊ दिली, अशा भावना त्यांनी बोलून दाखवल्या. पुढे त्यांना बोलताही आले नाही, इतके त्यांना अक्षरश: रडू कोसळल्याचे पाहायला मिळाले. धनंजय मुंडे यांच्यासह सर्वज राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांना अश्रू अनावर झाले आहेत.



आजचा दिवस अतिशय दु:खद बातमीने सुरू झाला महाराष्ट्राच्या राजकारणात प्रभाव असणारे, प्रशासनावर भक्कम पकड असणारे नेते आणि आपल्या स्वभावाने रोख ठोक असणारे मात्र तेवढ्याच ताकदीने काम करणारा नेता म्हणून अजित दादांची ओळख होती मात्र आज दादांच्या अकाली जाण्याने आम्हा पाटील कुटुंबाला मोठा धक्का बसला आहे आमचे आणि पवार परिवाराचे कौटुंबिक स्नेह होते ही बातमी अत्यंत वेदनादायी आहे.



महाराष्ट्राच्या राजकारणात एकमेव नेता अजित दादा असे होते की ते पहाटे ५ वाजल्यापासून आपल्या कामाला लागायचे. बिनधास्त, निर्भीड, कणखर आणि योग्य कामास वेळेत आणि भक्कमपणे पाठिंबा देणारे आणि स्पष्ट बोलणारे दादा म्हणून त्यांची राज्यात ओळख होती.ज्यांनी जवळजवळ ४ दशकांहून अधिक काळ राज्याच्या राजकारणात आपला ठसा कायम ठेवला. योग्य नियोजन, प्रशासनावर पकड, मिश्किल स्वभाव पण कामाच्या बाबतीत कठोर; अस बरंच काही... कायम आपल्या कामात व्यस्त असणारा धुरंधर असा नेता गेला!!सद्या दादा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री असल्याने बीड च्या बाबतीत अनेक विषयांवर दादासोबत चर्चा व्हायची बीड साठी सकारात्मक पद्धतीने अजित दादा सहकार्ये करत होते. कधी नव्हे ते बीड जिल्ह्याने पहाटे ६ वाजताची उद्घाटने, अचानक शासकीय रुग्णालयात भेट असे अनोखे अनुभव दादांच्या माध्यमातून जिल्ह्याने अनुभवली असा सर्वांना सोबत घेऊन चालणारा व जनतेला आणि कामाला प्राधान्य देणारा हा नेता होता आणि ही उणीव कायम राहील.अजित पवारांशिवाय महाराष्ट्राचं राजकारण आणि समाजकारण बेचव असेल....
दादांना भावपूर्ण श्रद्धांजली!!

-सौ.रजनी पाटील
(खासदार राज्यसभा)

# संपादकीय

## घातक पाणी



इंदूरमध्ये दूषित पाण्यामुळे २७ जणांचा मृत्यू झाला आहे. जलवाहिन्यांमार्फत दूषित पाण्याचा पुरवठा आणि त्यामुळे महू येथील काविळीची साथ याचा फटका नागरिकांना बसत आहे. इंदूरनंतर महूतील घटना, प्रशासन यंत्रणा किती बेपर्वाईपणाची आहे आणि किती नागरिकांच्या आरोग्याशी खेळते आहे हे सिद्ध होते.मध्य प्रदेशातील इंदूर शहरातील जलसंकट आणि दूषित पाण्याची चर्चा सध्या देशभर आहे. इंदूरमध्ये दूषित पाण्यामुळे २७ जणांचा मृत्यू झाला आहे. जलजन्य आजारांमुळे अनेक रुग्ण विशेषतः लहान मुले रुग्णालयात दाखल आहेत. ज्या शहराला स्वच्छतेबद्दल सातत्याने पुरस्कार मिळत आले आहेत, त्या राज्यातील लहान मुले दूषित पाण्यामुळे आजारग्रस्त आहेत, हे विदारक सत्य पाहायला मिळत आहे. महूमध्ये २२ जणांमध्ये काविळीची लक्षणे आढळून आली. वास्तविक कावीळ हा काही असाध्य आजार नाही. पण इंदूरच्या जलवाहिन्यांमध्ये असलेल्या प्रदूषणामुळे भयानक रोगाने पुन्हा डोकेवर काढले आहे. इंदूरमध्ये दूषित पाण्यामुळे काहीजण मृत्यूमुखी पडल्यावर महूतील घटना इंदूरची प्रशासन यंत्रणा किती बेपर्वाईपणाची आहे आणि किती नागरिकांच्या आरोग्याशी खेळते आहे हे सिद्ध होते.महु येथे तर एक विहीर दूषित पाण्याने भरलेली आढळली. २४ हून अधिक नागरिक येथे आजारी पडले आणि आता या भागातील प्रशासनाने खबरदारीचे उपाय हाती घेतले आहेत. इंदूरच्या घटनेनंतर महु येथील घटना प्रशासनाला खडबडून जाग आणणारी ठरली आहे. पण यामुळे नागरिकांना पुरेसे स्वच्छ पाणी आणि पिण्यासाठी चांगले पाणी मिळेल का असा प्रश्न उभा राहिला आहे. इंदूर की महू असो की भारतातील कोणतेही लहान तालुकास्तरीय गाव असो, येथील नागरिकांना एका व्यापक सत्याला सामोरे जावे लागत आहे. ते म्हणजे स्वच्छ पाण्यापर्यंत पोहोच आणि सुरक्षा हे एकमेकांना पूरक असले पाहिजेत. पण, नेमके तेच त्यांना मिळत नाही. केवळ नागरिकांना पाणी देण्यामुळे आरोग्यावर झालेले परिणाम सुधारणार नाहीत तर त्यासाठी स्वच्छ पाणी मिळणे तितकेच गरजेचे आहे. भारतात जे जलजन्य आजारांच्या साथी येत आहेत. त्यांना दुर्दैवी परंतु पृथक स्थानिक स्वराज्य संस्थांची ढिलाई म्हणून पाहिले जाते. स्थानिक अधिकाऱ्यांचे हे अपयश तर आहेच पण जुनाट पाइपलाइन आणि क्वचित गंजलेल्या पाइपमधून पाणीपुरवठा होत राहणे हेही या साथींचे कारण आहेच. भागीरथपुरा येथील दुर्घटना हे दर्शवते, की हा एक अपघात नव्हता तर संभाव्य दृश्य परिणाम होता ज्यात सरकारी कारभाराचे मॉडेल ज्यात केवळ दिखाऊ स्वच्छता आणि आकडेवारीने मूलभूत सार्वजनिक आरोग्य आणि लोकांना स्वच्छ पेयजल देण्याचे वचन पाळले गेले नाही. इंदूर शहरातील शोकांतिकेने एक प्रश्न निर्माण केला आहे तो म्हणजे नळातून जर सांडपाणी येत असेल तर शहराच्या स्वच्छतेला काय अर्थ?.सरकारने टाकलेल्या जलवाहिन्यांमार्फत दूषित पाण्याचा पुरवठा आणि त्यामुळे महू येथील काविळीची साथ याचा फटका नागरिकांना बसत आहे. तसेच इंदूरमध्ये अतिसाराची साथ आली आणि त्यात काही नागरिकांचा बळी गेला आहे. याचा अर्थ सरळ आहे. नगरपालिका प्रशासनाने यात कुचराई केली आहे. जलवाहिन्या गंजलेल्या आहेत आणि भगीरथपुरा येथील एक जलवाहिनी तर स्वच्छतागृहाच्या खाली दबलेली होती. महूमध्ये पट्टी बाजार आणि चंदन नगर येथे गळक्या पाइपलाइनमुळे काविळीची साथ पसरली, महुमध्ये पाणीपुरवठा आणि स्वच्छतेची जबाबदारी कटक मंडळ (कॅन्टोनमेंट बोर्ड)ची आहे. रहिवाशांना उकळून पाणी पिण्याचा सल्ला देण्यात आला. पण 'बैल गेला आणि झोपा केला' अशी ही स्थिती आहे.कॅगने २०१९ च्या अहवालात ८.९५ लाख रहिवाशांना दूषित पाण्याचा पुरवठा केल्याचा ठपका ठेवला होता. तसेच पाण्याच्या नमुन्यांचे सर्वेक्षण न केल्याचा आरोपही करण्यात आला होता. हे म्हणजे नागरिकांच्या आरोग्याशी अक्षम्य छेडछाड आहे असे नमूद करावे लागेल आणि त्याबाबत कुणालाही खंत नाही किंवा खेदही नाही ही बाब जास्त दुःखदायक आहे. अधिकाऱ्यांनी पाण्यामुळे होणाऱ्या आजाराची ५.४५ लाख प्रकरणे नोंदवली. पण त्यातही गंभीर बाब अशी की कॅगने आपल्या अहवालात पाण्याच्या चाचण्यांचा अभाव नोंदला आहे. त्यामुळे इंदूर किंवा महू किंवा मध्य प्रदेशात कुठेच पाणी दूषित आहे की नाही याची काहीच खातरजमा करता येत नाही.आता हा दूषित पाण्याचा पुरवठा हा निश्चितच मध्यप्रदेशातील राजकीय पक्षांसाठी वादाचा मुद्दा बनला आहे. या मुद्यामुळे व्यापक पाण्याचा पेच तर ऐरणीवर आला आहेच पण काँग्रेस आणि भाजप यांच्यात जोरदार वाद रंगला आहे. काँग्रेसने या मुद्यावर व्यापक जनमोर्चे आयोजित केले तर भाजपने त्याला जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. वास्तव हे आहे की पाणी हा राजकीय मुद्दा आहेच. कारण पाण्यावरून लढाया होतील असे भाकीत वर्तवले होते.कोणतेही सरकार मग ते कोणत्याही पक्षाचे असो, ते इतक्या अफाट लोकसंख्येला पुरेसे आणि स्वच्छ पाणी पुरवू शकत नाही. पण याचा अर्थ असा नव्हे की इंदूर नगरपालिकेने केले ते योग्य केले. पण सरकारची क्षमता इतक्या लोकसंख्येला सुरक्षित पाणी पुरवण्याची नाही. यात राजकारण आणणे चुकीचे नव्हे तर निषेधार्ह आहे. मध्यप्रदेशात जे घडले किंवा घडत आहे ते सार्वत्रिक दृश्य आहे. त्यात नगरपालिका स्वच्छ पाण्याचा पुरवठा करत नसतील आणि त्यात काही अडचणी असतील तर त्यांना ती नगरपालिका जबाबदार आहे.

# कुरकुटे परिवारातर्फे वडवणी येथे हळदी कुंकू व होम मिनिस्टर कार्यक्रम संपन्न

## माजी सभापती सौ.सुलोचना आंधळे यांच्या हस्ते उद्घाटन



दैनिक वादळ वार्ता


**बीड । प्रतिनिधी**

वडवणी येथील,सौ.प्रियांका गणेश कुरकुटे व समस्त कुरकुटे परिवाराच्या वतीने मकर संक्रांतीच्या सणाचे औचित्य साधून सुहासिन महिलांचे सौभाग्याचं लेणं हळदी कुंकू व क्षण आनंदाचा ..खेळ पैठणीचा होम मिनिस्टर कार्यक्रमाचे आयोजन रविवार दि.२५ जानेवारी २०२६ रोजी काळा हनुमान मंदिर वडवणी या ठिकाणी राहत्या घरी आयोजित करण्यात आला. हळदी कुंकू व होम मिनिस्टर या कार्यक्रमाची सुरुवात वडवणी पंचायत समितीच्या माजी सभापती सौ. सुलोचनाताई आंधळे तसाच वडवणी नगरपंचायत च्या नगराध्यक्षा सौ.वंदनाताई जगताप,माजी नगराध्यक्षा सौ.कांचनताई मुंडे,मुख्याध्यापिका सौ.शोभाताई डोईफोडे,नगरसेविका सौ.रंजना डिगे,नगरसेविका सौ.उज्वला टकले,महिला पत्रकार सौ.गिताजंली लव्हाळे,सामाजिक कार्यकर्त्या सौ.प्रमिलाताई माळी,प्रिन्सिपल श्रीमती अंजली आंधळे यांच्या हस्ते दीप प्रज्वलन व प्रतिमा पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. सन्मानाची व आनंदाची अनुभूती देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. सवासिनींना हळदी कुंकू लावून वान देऊन तिळगुळ घ्या गोड गोड बोला म्हणत.महिलांच्या आवडीचा आणि अत्यंत लोकप्रिय असलेला ,होम मिनिस्टर हा खेळ या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण होते.या खेळातून मान -सन्मान नारीशक्तीचा ! या संकल्पनेवर आधारित या खेळातून महिलांचे कौशल्य, आत्मविश्वास, हुशारी व व्यक्तीमत्व दिसून आले. या कार्यक्रमात विविध मनोरंजनात्मक सहभागात्मक उपक्रम, प्रश्नोत्तरे महिलांसाठी तसेच विजेत्या व सहभागी सन्मान बक्षिसांचे वितरण पारितोषिक मान्यवरांच्या हस्ते देऊन त्यांच्या सन्मान करण्यात आला. हळदी कुंकू सोहळा व होम मिनिस्टर कार्यक्रम आनंद,उत्साह आणि आपुलकीने भरून गेला होता. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सौ. प्रियंका कुरकुटे यांनी केले तर बहारदार सूत्रसंचालन कु.शिवानी बडे यांनी केले.या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या वडवणी शहरात सर्वत्र या कार्यक्रमाचे कौतुक होत आहे.

# श्री एकविरा विद्यालयात ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । प्रतिनिधी**



चारकोप, कांदिवली येथील श्री एकविरा विद्यालयात ७७ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात आणि देशभक्तीपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या प्रसंगी भारतीय नौदलाच्या आयएनएस मालाड येथील लेफ्टनंट कमांडर ईशा सिंग यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण पार पडले. या कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष श्री अजित पाटील, कार्यवाह श्री विनायक पाटील तसेच विश्वस्त मंडळाचे सदस्य उपस्थित होते. पूर्व-प्राथमिक, प्राथमिक आणि माध्यमिक विभागातील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री मदन शिरकांडे यांनी केले. अध्यक्ष श्री अजित पाटील यांनी विद्यार्थ्यांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा देत भारतीय संविधानाचे महत्त्व, शिस्त, देशप्रेम आणि जबाबदार नागरिक म्हणून असलेल्या कर्तव्यांबाबत मार्गदर्शन केले.प्रमुख पाहुण्या लेफ्टनंट कमांडर ईशा सिंग यांनी प्रेरणादायी भाषण करत विद्यार्थ्यांना संरक्षण दलात सामील होण्याचे, देशसेवेला प्राधान्य देण्याचे तसेच जबाबदार आणि सजग नागरिक बनण्याचे आवाहन केले.कार्यक्रमात राष्ट्रगीत, देशभक्तीपर गीते, सांस्कृतिक सादरीकरणे आणि विद्यार्थ्यांचे विविध कलात्मक कार्यक्रम सादर करण्यात आले. शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, पालक, विद्यार्थी आणि माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या उत्साही सहभागामुळे संपूर्ण परिसर देशप्रेमाच्या भावनेने भारावून गेला.०या सोहळ्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रभक्ती, कर्तव्यभावना आणि देशसेवेची प्रेरणा अधिक दृढ झाल्याचे स्पष्ट झाले. श्री एकविरा विद्यालयाने अशा उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेमाची ज्योत सदैव प्रज्वलित ठेवली आहे.

# संवेदना सोशल फाऊंडेशनचा प्रजासत्ताक दिन सोहळा व पारितोषिक वितरण समारंभ संपन्न

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । प्रतिनिधी**



विक्रोळी कन्नमवार नगरातील संवेदना सोशल फाऊंडेशनचा प्रजासत्ताक दिन सोहळा व पारितोषिक वितरण समारंभ प्रगती विद्यालयात उत्साहात साजरा करण्यात आला.संवेदना सोशल फाऊंडेशन दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत आहे.याप्रसंगी श्री. श्याम परुळेकर मुंबई पोलीस दलातील सेवानिवृत्त वर्ग-१ राजपत्रित अधिकारी (वरिष्ठ पोलीस निरीक्षक) हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.कार्यक्रमात श्री दिनेश बैरीशेट्टी अध्यक्ष, दिशा फाऊंडेशन,श्री निलेश साळवी मनसेचे शाखा अध्यक्ष, प्रभाग क्रमांक ११८,श्री. हरिदास बेहेनवार, संचालक, प्रगती विद्यालय ,ज्येष्ठ पत्रकार व डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार महाराष्ट्र शासन सन्मानित नासिकेत पानसरे,पत्रकार सहिष्णुता कांबळे आदिंची भाषणे झाली श्याम परुळेकर यांनी संस्थेच्या कार्याचे कौतुक करून दिव्यांग मुलांना त्यांचे चांगले संवर्धन करून आपले मार्गदर्शन होणार आहे.ही मुले पुढे नाव कमवतील.त्यांचा भविष्यकाळ उज्वल असून हे कोटीचे काम आहे.असे अधोरेखित केले.शिरीसकर कुटुंबियांचे हे काम फार उत्तम आहे.असे ते पुढे म्हणाले.प्रारंभी श्याम परुळेकर यांच्या हस्ते प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहण करण्यात आले.त्यानंतर दिव्यांग मुलांसाठी आयोजित केलेल्या स्पर्धांचा पारितोषिक वितरण समारंभ मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.प्रास्ताविक संथेचे उपाध्यक्ष गणेश शिरीसकर यांनी केले.या प्रसंगी मुलांनी नाच व गाणी सादर केली.संवेदना सोशल फाऊंडेशन संस्थेच्या अध्यक्षा प्रिती शिरीसकर यांनी कार्यक्रमाचे संयोजन उत्कृष्ट केले होते.संवेदना सोशल फाऊंडेशन उपाध्यक्ष श्री गणेश शिरिसकर, संवेदना सोशल फाऊंडेशन खजिनदार श्री नितीन शिरीसकर, सौ. गायत्री गायकवाड शिक्षक,सौ पल्लवी वारंग मदतनीस यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बरिच मेहनत घेतली होती.

# अथर्व युनिव्हर्सिटीमध्ये ७७ वा प्रजासत्ताक दिन महिला पोलीस कर्मचाऱ्यांच्या सन्मानाने साजरा



दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । प्रतिनिधी**

२६ जानेवारी २०२६ रोजी मुंबईतील अथर्व युनिव्हर्सिटीच्या शैक्षणिक संकुलात भारताचा ७७ वा प्रजासत्ताक दिन अत्यंत उत्साहात व देशभक्तीच्या वातावरणात साजरा करण्यात आला. या निमित्ताने महिला सशक्तीकरण, सामाजिक जबाबदारी आणि राष्ट्रसेवा यांचा प्रभावी संदेश देण्यात आला. अथर्व युनिव्हर्सिटीचे संस्थापक व कुलपती श्री. सुनील राणे यांच्या संकल्पनेतून मुंबई पोलीस दलातील कर्तव्यदक्ष १० महिला पोलीस कर्मचाऱ्यांना अत्याधुनिक लॅपटॉप भेट देऊन सन्मानित करण्यात आले. डिजिटल युगात त्यांच्या कार्यक्षमतेत वाढ व्हावी आणि तंत्रज्ञानाशी अधिक सक्षमपणे जोडले जावे, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. हा सन्मान कुलपती श्री. सुनील राणे, बांगूर नगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शैलेंद्र नगरकर तसेच मालवणी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र आव्हाड यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. सन्मानित महिला पोलीस कर्मचाऱ्यांमध्ये सारिका सारंग (गोराई), कविता नलावडे (वनराई), शुभांगी शिरगावे (दिंडोशी), सुनीता कांबळे, सुषमा जाधव (दहिसर), मोनिका तोरणे (गोरेगाव), विद्या कावरे (वर्सोवा), धनश्री डेमरे (अंधेरी), नीता धोंडे (डी. एन. नगर) आणि सुजाता पाटील (ओशिवरा) यांचा समावेश होता. या कार्यक्रमाला अथर्व युनिव्हर्सिटीचे अधिकारी, प्राध्यापक, कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे समाजात आपल्या उल्लेखनीय कार्यातून वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या महिला पोलीस कर्मचाऱ्यांचा यथोचित सन्मान. यावेळी बोलताना कुलपती श्री. सुनील राणे म्हणाले, देशाच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनी आम्ही महिला पोलीस कर्मचाऱ्यांच्या धैर्य, कर्तव्यनिष्ठा आणि समर्पणाला मानवंदना देत आहोत. आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून त्यांना अधिक सक्षम करणे म्हणजे सुरक्षित, सशक्त आणि प्रगत भारत घडवण्याच्या दिशेने टाकलेले ठोस पाऊल आहे. प्रजासत्ताक दिन हा केवळ उत्सव नसून संविधानाने दिलेल्या समानता, अधिकार आणि कर्तव्यांची जाणीव करून देणारा दिवस आहे. महिला पोलीस कर्मचाऱ्यांना तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सक्षम करणे हे राष्ट्रनिर्मितीसाठी अत्यंत सकारात्मक व प्रेरणादायी पाऊल असल्याचे यावेळी उपस्थित मान्यवरांनी नमूद केले.

# लोकशाहीच्या अधिकाराचा जनतेतून इशारा!

## टेंभुर्णीत गावकऱ्यांनीच केले आयुष्यमान आरोग्य मंदिराचे उद्घाटन

दैनिक वादळ वार्ता

**नायगांव । हानुमंत चंदनकर**

नांदेड जिल्ह्यातील नायगाव तालुक्यातील टेंभुर्णी येथे लोकप्रतिनिधी व प्रशासनाच्या उदासीनतेला वैतागून अखेर गावकऱ्यांनीच आयुष्यमान आरोग्य मंदिराचे उद्घाटन केल्याची खळबळजनक घटना घडली आहे. भारताच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनी लोकशाहीचा अधिकार बजावत गावकऱ्यांनी केलेल्या या कृतीची चर्चा सध्या संपूर्ण तालुक्यात जोरात सुरू आहे.

राष्ट्रीय आरोग्य मिशन अंतर्गत टेंभुर्णी येथे सार्वजनिक आरोग्य विभागाने लाखो रुपये खर्चून उभारलेली आयुष्यमान आरोग्य मंदिराची नवी इमारत मात्र अनेक महिन्यांपासून वापराविना पडून होती. लोकप्रतिनिधी व प्रशासनाने इमारत रुग्णांसाठी खुली करणे अपेक्षित असताना, प्रत्यक्षात आरोग्य सेवा गावातील बौद्ध विहारात तात्पुरत्या स्वरूपात दिली जात होती. गावकऱ्यांनी संयम राखत वाट पाहिली; पण दिरंगाई कायमच राहिली.

**दोन्ही उद्घाटनाची तारीख २६**

चार महिन्यांपूर्वी २६ सप्टेंबर २०२५ रोजी मांजरम गावातील तरुणांनी पुढाकार घेत प्राथमिक आरोग्य केंद्राचे उद्घाटन करून प्रशासनाला धक्का दिला होता. त्याच धर्तीवर टेंभुर्णीतही लोकप्रतिनिधी व प्रशासनाला न जुमानता गावकऱ्यांनी सर्वानुमते २६ जानेवारी रोजी उद्घाटन करून आरोग्य सेवेचा मार्ग मोकळा केला.




लोकप्रतिनिधींची एकाधिकारशाही आणि प्रशासनातील समन्वयाचा अभाव यामुळे रुग्णांची होत असलेली हेळसांड अखेर जनतेच्या सहनशीलतेच्या पलीकडे गेली. गावकरी ते राव नकरी या म्हणीचा प्रत्यय देत, टेंभुर्णीकरांनी लोकशाही मार्गाने आपला आवाज बुलंद केला.

**जनतेची उद्घाटने'–मांजरम सर्कलमध्ये नवा पॅटर्न?**

मांजरम सर्कलमधील दुसरी घटना

लाखो खर्चाची इमारत असूनही सेवा विलंबित

प्रशासनाच्या दिरंगाईला प्रजासत्ताक दिनी प्रतीकात्मक उत्तरलोकप्रतिनिधी व प्रशासनाने धडा घेण्याची गरज–गावकऱ्यांची ठाम मागणी

## युवकांनी प्रत्यक्ष कृतीतून समाजविकासात योगदान द्यावे–दत्तात्रय क्षीरसागर

# शिवणी येथे तुलसी फॅशन डिझाईन कॉलेजच्या रासेयो शिबिराचे उत्साहात उद्घाटन

दैनिक वादळ वार्ता

**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी, स्वच्छता आणि राष्ट्रप्रेमाची भावना निर्माण होते. युवकांनी समाजाच्या विकासासाठी प्रत्यक्ष कृतीतून योगदान द्यावे, असे प्रतिपादन महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, बीडचे प्रकल्प अधिकारी दत्तात्रय क्षीरसागर यांनी केले. देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने मंगळवार,दि.२७ रोजी मौजे शिवणी येथे 'शाश्वत विकास, पाणलोट व्यवस्थापन व पडीक जमीन विकासासाठी युवा' या थीमखाली आयोजित सातदिवसीय विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.अश्विनी बेद्रे होत्या,तर प्रमुख पाहुणे म्हणून समुदाय आरोग्य अधिकारी डॉ.दिनेश काकडे, तुलसी आय.टी. कॉलेजचे प्राचार्य प्रा.डी.जी. निकाळजे उपस्थित होते.



यावेळी प्रा.निकाळजे म्हणाले की, युवकांमध्ये देशभावना जागृत होऊन देशभक्तीतून समाजसेवा घडावी, हा राष्ट्रीय सेवा योजनेचा मुख्य उद्देश आहे. महात्मा गांधीजींच्या संकल्पनेतून राष्ट्रीय सेवा योजनेची मुहूर्तमेढ रोवली गेली असून, ही सामाजिक जाणिवेची चळवळ आहे. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव व सामाजिक बांधिलकी निर्माण करणे हे तिचे प्रमुख ध्येय असल्याचे त्यांनी स्पष्ट केले

अध्यक्षीय भाषणात डॉ.बेद्रे यांनी 'खेड्याकडे चला' या गांधीजींच्या विचारांची मांडणी करत ग्रामीण सक्षमीकरणाचे महत्त्व स्पष्ट केले. खेडे हा भारताचा कणा असून, ग्रामीण विकासाशिवाय शहरी प्रगती शक्य नाही. शेतकऱ्यांकडून मिळणाऱ्या कच्च्या मालामुळे देश चालतो. स्वच्छता, पर्यावरण संवर्धन व वृक्षसंवर्धनावर भर देत स्वतःपासून बदल घडवण्याचे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.वृषाली लोखंडे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार श्वेता वंजारे यांनी मानले. या प्रसंगी उपप्राचार्य प्रा.सय्यद शहाणा यांचेसह राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच शिवणी येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# निवेदन न स्वीकारल्याने आशा स्वयंसेविकांचा निषेध; संपाचा इशारा



दैनिक वादळ वार्ता

**जळगाव । जितु इंगळे**

जळगाव जिल्ह्यातील आशा स्वयंसेविकांच्या प्रलंबित मागण्यांकडे जिल्हा परिषदेने दुर्लक्ष केल्याने प्रजासत्ताक दिनी जिल्हा परिषदेसमोर धरणे आंदोलन करण्यात आले. मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी निवेदन स्वीकारण्यासाठी न थांबल्यामुळे आशा युनियनतर्फे तीव्र नाराजी व्यक्त करत संबंधित अधिकाऱ्यांचा जाहीर निषेध करण्यात आला.

जननी सुरक्षा योजनेअंतर्गत सन २०२३ पासूनचा थकीत मोबदला तातडीने देण्यात यावा, प्राथमिक आरोग्य केंद्र मुख्यालय असलेल्या आशा स्वयंसेविकांना आरोग्यवर्धिनीच्या कामाचा मोबदला अदा करण्यात यावा, तसेच काही प्राथमिक आरोग्य केंद्रांतील जिओ टॅग फोटो प्रिंटची अट रद्द करावी, अशा प्रमुख मागण्या यावेळी मांडण्यात आल्या. याशिवाय शासन नियमानुसार आशा सेविकांना लागू नसलेल्या नियमबाह्य रजेची पद्धत बंद करण्याचीही मागणी करण्यात आली.

या मागण्यांसाठी यापूर्वी १७ जानेवारी रोजी निवेदन देऊन चर्चा करण्याची विनंती करण्यात आली होती. मात्र त्याकडे दुर्लक्ष झाल्याने नाईलाजास्तव आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागल्याचे युनियनने सांगितले. युनियनचे नेते रामकृष्ण बी. पाटील यांनी येत्या पंधरा दिवसांत प्रश्न न सुटल्यास फेब्रुवारी महिन्यात जिल्हाभर बेमुदत काम बंद (संप) आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.

# लोणखेडा येथे खुलेआम अवैध दारू विक्री; प्रशासन गप्प का?

दैनिक वादळ वार्ता

**लाला चव्हाण । लोणखेडा**

शहादा तालुक्यातील लोणखेडा गावात अवैध दारू विक्रीने धुमाकूळ घातला आहे. या गावात कायदा व सुव्यवस्थेचा पुर्नपुन्हा फज्जा उडाल्याचे दिसून येत आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, गावात दिवसाढवळ्या आणि निर्भयपणे अवैध दारूची विक्री सुरू आहे, आणि यावर संबंधित यंत्रणांचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याचा गंभीर आरोप स्थानिक नागरिक करत आहेत.




नागरिकांचा आरोप आहे की, पोलिस आणि प्रशासन केवळ नावा पुरत्या कारवाया करीत आहेत. अनेक वेळा कारवाई करण्याची पूर्वसूचना दिल्यामुळे विक्रेते धाडी टाकल्यानंतर लगेचच पुन्हा विक्री सुरू करतात, असे उघड सत्य आहे. यामुळे अवैध दारू विक्रेते आपल्या व्यवसायात सुरक्षित आहेत, त्यांना अडचणी येत नाहीत. अवैध दारूच्या विक्रीमुळे गावातील तरुण व्यसनाच्या गर्तेत अडकले आहेत. अनेक कुटुंबांचे जीवन उध्वस्त झाले आहे. महिलांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे आणि घरगुती वाद, भांडणे आणि गुन्हेगारी घटनांमध्ये वाढ झाल्याचे स्थानिक नागरिक सांगतात. त्यांना विश्वास नाही की प्रशासन या गंभीर समस्येवर काही ठोस पाऊले उचलणार आहे.नागरिकांनी सवाल केला आहे की, जर कायदा इतकाच कमजोर असेल, तर अवैध दारू विक्रेत्यांना मोकळे रान का? त्यांचा आरोप आहे की प्रशासन बड्या कारवायांच्या घोषणा करीत आहे, परंतु प्रत्यक्षात त्या घोषणा केवळ कागदावरच राहतात. नागरिकांना विचारणाऱ्यांमध्ये प्रश्न उपस्थित केला जात आहे की, केवळ घोषणांचा नवा छटा न करता प्रत्यक्षात कठोर व कायमस्वरूपी कारवाई होणार का?प्रशासनाकडून यावर कुठलेही ठोस उत्तर येत नाही, आणि नागरिकांची नाराजी दिवसेंदिवस वाढत आहे. यामुळे प्रश्न निर्माण होत आहे की, कायदा आणि सुव्यवस्थेचे पालन करणारे अधिकारी या गंभीर प्रकरणात गप्प का आहेत?

# श्रमजीवी महिला माळी मंडळाचा हळदीकुंकू समारंभ

दैनिक वादळ वार्ता

**नवी मुंबई । प्रतिनिधी**

श्रमजीवी महिला माळी मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेला हळदीकुंकू समारंभ उत्साहात व आनंदी वातावरणात पार पडला. या समारंभास परिसरातील नागरिकांसह राजकीय, सामाजिक तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून कार्यक्रमास भेट दिली व शुभेच्छा व्यक्त दिल्या.



महिला पतंजली ग्रुप ऐरोली, विश्व मांगल्य महिला ग्रुप, नवनिर्वाचित नगरसेविका पूजाताई पाटील, हेमांगी ताई सोनवणे, ऐश्वर्या सोनवणे, श्रेया जिरगे,रेश्मा मढवी,माजी नगरसेविका विनायताई मढवी या प्रसंगी उपस्थित होते. महिलांना हळदीकुंकू लावून वाणाचे वाटप करण्यात आले. तसेच महिलांसाठी १० लकी ड्रॉ चे आयोजन करण्यात आले असून, विजेत्या महिलांना आकर्षक बक्षिसे देण्यात आली. अशी माहिती श्रमजीवी महिला मंडळाच्या सचिव शितल शिंदे यांनी दिली.यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, भविष्यात संत सावता माळी मंडळाच्या माध्यमातून आरोग्यविषयक तसेच विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात येणार आहेत.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्रमजीवी महिला मंडळाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी व सभासदांनी मोलाचे सहकार्य केले.यामध्ये अध्यक्षा इंदुमती भास्कर,खजिनदार धनश्री शिंदे तसेच उज्वला शिंदे, मंगल नाईक, मानसी नाईक, तसेच सर्व कार्यकारिणी व सभासदांचा समावेश होता.या हळदीकुंकू कार्यक्रमासाठी विशेष सहकार्य केल्याबद्दल संत सावता माळी मंडळाचे अध्यक्ष सूर्यकांत थोरात तसेच सचिव रोहित हरिश्चंद्र भुजबळ यांनी श्रमजीवी महिला मंडळाच्या प्रत्येक सामाजिक कार्यामागे संत सावता माळी मंडळ ठामपणे उभे राहील. महिलांनी स्वतःच्या पायावर उभे राहावे ,स्वतःचे अस्तित्व तयार करावे , पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून ,प्रगती करावी असा एक कानमंत्र दिला.

# वादळी कट्टा

प्रियसी भेटत नाही, कारण सांगते कामाचं,
फोनभर प्रेम ओतते, भेटीला मात्र टाळाचं.
नजरेत स्वप्नं सजतात, भेटीवर पडतो ब्रेक,
प्रेम ऑनलाईन भारी, ऑफलाईन मात्र फेक!

भेटायचं बोलते रोज, पण येतच नाही वेळ,
मेसेंजरवर प्रेम भारी, भेटीला मात्र खेळ.
हसऱ्या इमोजीत अडकतं सगळं प्रेमाचं जाळं,
समोर यायची वेळ आली, की नेटवर्कचं कारणं!

भेटीचं नाव काढलं, की सुरू होते परीक्षा,
कधी घरचं कारण पुढं, कधी मैत्रिणीची शिक्षा.
प्रेमाच्या गप्पा गोड, शब्दांमधली मिठी,
प्रत्यक्ष भेटीच्या वेळी मात्र कायमची सुट्टी!

भेटीचं नाव घेतलं, की तुझा दिनदर्शक भरलेला,
प्रेमासाठी वेळ कमी, पण स्टेटस मात्र दर तासाला बदललेला.
समजून घे हेच वाक्य नेहमीचं शस्त्र तुझं,
भेट न देता प्रेम मागणं, हेच गं तंत्र तुझं!

भेटीचं नाव निघालं, की नियमांची रांग उभी,
प्रेमासाठी धाडस नाही, पण अपेक्षा मात्र अगदीच भारी.
तूच बदल असा देतेस नेहमीच मला सल्ला,
भेट टाळून प्रेम टिकतं, हा कोणत्या पुस्तकातला धडा?

संपादक
अजय भांगे



# न्हावा शेवा सी एच ए आधार सामाजिक संस्था आयोजित आधार चषक २०२६ स्पर्धा उत्साहात संपन्न

## रसिक प्रेषक,तरुण वर्गाचा उत्स्फूर्त सहभाग;विविध मान्यवराकडून स्पर्धेचे व संस्थेच्या कार्याचे कौतुक

दैनिक वादळ वार्ता

**उरण । प्रतिनिधी**

उरण विभागात सतत होत असलेल्या अपघातात मृत्यूमुखी पडलेल्या व्यक्तींच्या कुटुंबासाठी तसेच दुखापत झालेल्या सीएचए बांधवांसाठी अपघात ग्रस्त निधी संकलनासाठी त्याचप्रमाणे विविध सामाजिक कार्य करण्याच्या उद्देशाने मी मराठी मैदान मोठी जुई,उरण येथे सी एच ए आधार चषकाचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेला रसिक प्रेषक, तरुण वर्गांचा मोठा उत्तम प्रतिसाद लाभला.दरवर्षी सीएचए आधार चषक या क्रिकेट स्पर्धेचे आयोजन केले जाते व स्पर्धेतील मिळणारी रक्कम अपघातग्रस्तांसाठी व सामाजिक कार्यासाठी वापरली जाते अशा या सीएचए आधार चषकासाठी नागरिकांनी, रसिक प्रेक्षकांनी दरवर्षी प्रमाणे याही वर्षी मोठ्या प्रमाणात उपस्थिती दर्शविली होती.विविध क्षेत्रातील मान्यवरांनी या स्पर्धेला भेट देऊन सदर स्पर्धेचे व संस्थेच्या कार्याचे कौतुक केले. सदर स्पर्धा यशस्वी करण्यासाठी न्हावा शेवा सी एच ए आधार सामाजिक संस्थेच्या सर्व पदाधिकारी सदस्यांनी विशेष मेहनत घेतली.या स्पर्धेत प्रथम क्रमांकाचा मानकरी संघ रॉकस्टार मोठीजूई ठरला तर द्वितीय क्रमांकाचा मानकरी संघ द्विज इलेव्हन पाले ठरला आहे. या संघावर सर्वच स्तरातून शुभेच्छा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



**संस्थेचे विषयी थोडक्यात माहिती**

उरण तालुक्यात तसेच न्हावा शेवा बंदर परिसरात कस्टम हाऊस एजंट(C.H.A.) चे काम करणारे मराठी तरुण वर्ग मोठ्या प्रमाणात असून यात स्थानिक भूमिपुत्र मोठ्या प्रमाणात काम करीत आहेत. सीएचए (कस्टम हाऊस एजेंट ) हे जेएनपीटी व न्हावा शेवा परिसरातील विविध कॅन्टेनर, ट्रक, टेम्पो, जड अवजड मालवाहू वाहने यांच्या कागदपत्राचे पासिंगचे(एक्सपोर्ट आणि इम्पोर्टचे)काम करतात.रात्रंदिवस काम करून, आपला जीव धोक्यात घालून संसार चालवितात व जमेल तेवढं समाजकार्य करतात.अशा या स्थानिक भूमिपुत्र मराठी तरुणांना न्याय मिळावा त्यांचे अधिकार व हक्क त्यांना मिळावेत अपघातग्रस्तांना मदत करता यावी यासाठी न्हावा शेवा सी एच ए आधार सामाजिक संस्थेची स्थापना झाली.आज पर्यंत अनेक सामाजिक कार्य या संस्थेच्या माध्यमातून करण्यात आली आहेत.आजपर्यंत अपघातग्रस्त व अपघातात मृत्यू पावलेल्या पूर्व विभागातील अनेक व्यक्तींना या संस्थेच्या माध्यमातून लाखो रुपयाची मदतही करण्यात आली आहे.उरण विभागात सतत होत असलेल्या अपघातात मृत्यूमुखी पडलेल्या व्यक्तींच्या कुटुंबासाठी तसेच दुखापत झालेल्या सीएचए बांधवांसाठी अपघात ग्रस्त निधी संकलनासाठी सदर संस्था नेहमी अग्रेसर असते.त्याचप्रमाणे विविध सामाजिक कार्यही या संस्थेच्या माध्यमातून होत असतात.

# पोलिस उपनिरीक्षक राकेश बनसोडे यांचे ऑपरेशन मुस्कान सक्सेस!

# रागाने निघून गेलेल्या मुलीचा २४ तासाच्या आत तपास घेऊन पालकांच्या ताब्यात दिले

**दैनिक वादळ वार्ता**

**गौतम बचुटे । केज**

मेंढ्या सांभाळीत भटंकती करीत असलेल्या मेंढपाळची अल्पवयीन मुलगी ही पालक रागाने बोलले म्हणून कुणालाही न सांगता वस्ती वरुन निघून गेली होती. ती कुठे तरी निघून गेल्याचे माहित होताच तिचे पालक घाबरले आणि त्यांनी तत्काळ केज पोलिसांशी संपर्क साधला. केज पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक राकेश उर्फ सुकुमार बनसोडे यांना माहिती देताच त्यांनी ऑपरेशन मुस्कान अंतर्गत अवघ्या २४ तासाच्या आत त्या मुलीचा शोध घेऊन तिला तिच्या पालकाच्या ताब्यात दिले.

या बाबतची माहिती अशी की, पश्चिम महाराष्ट्रातील मेंढपाळ करीत असलेले अनेक मेंढपाळ हे बीड जिल्ह्यात आलेले आहेत. त्यापैकी काहीजण हे केज तालुक्यातील मस्साजोग येथील आवादा पवन ऊर्जा निर्मितीच्या परिसरात वस्तीला थांबलेले आहे. त्या मेंढपाळ कुटुंबातील एक १५ वर्षीय अल्पवयीन मुलगी ही दि. २६ जानेवारी रोजी घरातील तिचे पालक रागाने बोलले म्हणून कोणालाही न सांगता घरातून निघून गेली होती. ती त्यांच्या मुक्कामी वस्तीवर नसल्याचे निदर्शनास येताच तिचे पालक घाबरून गेले. तिच्या पालकांनी केज पोलिस ठाण्याशी संपर्क साधून मुलगी बेपत्ता असल्याची माहिती दिली. माहिती मिळताच केज पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांनी पोलिस उपनिरीक्षक राकेश उर्फ सुकुमार बनसोडे यांना ऑपरेशन मुस्कान अंतर्गत कारवाईचे आदेश दिले.

ऑपरेशन मुस्कान सक्सेस :- आदेश मिळताच पोलीस उपनिरीक्षक राकेश उर्फ सुकुमार बनसोडे यांनी सायबर सेलचे विक्की सूर्यवंशी यांच्या मदतीने त्या मुलीचे लोकेशन शोधण्याचा प्रयत्न केला; परंतु ती मुलगी तिच्या सोबत असलेला मोबाईल वारंवार चालू बंद करीत असल्याने प्रत्येक वेळी लोकेशन बदलत होते. त्यामुळे तपासात व्यत्यय येत होता. त्या नंतर दि. २७ जानेवारी रोजी मात्र तिचे अंतिम लोकेशन केज तालुक्यातील कुंबेफळ येथे आढळून आले. अंतिम लोकेशन निष्पन्न होताच पोलिस उपनिरीक्षक राकेश उर्फ सुकुमार बनसोडे, वाहन चालक सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक शंभूदेव दराडे, सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक सानप, पोलिस कॉन्स्टेबल किशोर गोरे यांनी तातडीने कारवाई करून सदर अल्पवयीन मुलीला ताब्यात घेतले. त्या नंतर तिला. केज येथे आणून तिला तिच्या आई वडिलांच्या ताब्यात सुखरूप दिले.

या ऑपरेशन मुस्कान अंतर्गत अवघ्या २४ तासाच्या आत कारवाई करून पालकांच्या ताब्यात दिल्या बद्दल पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे, पोलिस उपनिरीक्षक राकेश उर्फ सुकुमार बनसोडे आणि त्यांच्या पथकाचे सर्वत्र कौतुक होत आहे.



## चहाच्या टपरीसमोर उघडलेल्या कारच्या दरवाज्यामुळे भीषण अपघात; ट्रकच्या धडकेत दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू

**दैनिक वादळ वार्ता**

**शहदा । लाला चव्हाण**

कोठली येथे मंगळवारी दुपारी सुमारे ४ वाजण्याच्या सुमारास झालेल्या भीषण अपघातात मोटारसायकलस्वार दिलीप कापशा पटले (वय ३५) यांचा ट्रकच्या जबर धडकेत जागीच मृत्यू झाला. अपघात इतका भीषण होता की घटनास्थळी उपस्थित ग्रामस्थांनी आरडाओरड केली, मात्र त्यांचा जीव वाचू शकला नाही.

मूळचे मध्यप्रदेशातील लाखी भाचंकी येथील रहिवासी असलेले दिलीप पटले हे गेल्या पंधरा वर्षांपासून कोठली परिसरातील शेतकऱ्यांकडे रखवालदार म्हणून काम करत होते. त्यांनी काही शेतजमीन नफ्याने कसण्यास घेतली होती. मंगळवारी दुपारी फवारणीसाठी औषध आणण्यासाठी ते स्वतःच्या मोटारसायकल (क्र. MP 46 MU 4352) वरून वडाळी येथे जात असताना बसस्थानक परिसरातील चहाच्या टपरीजवळ हा अपघात घडला. चहाच्या टपरीजवळ उभ्या असलेल्या एका चारचाकी वाहनाच्या चालकाने अचानक गाडीचा दरवाजा उघडल्याने दिलीप पटले घाबरले. त्याच वेळी समोरून उसाने भरलेला ट्रक (क्र. MH-18 AA 5737) येत होता. दुचाकीचा तोल सुटून ते थेट ट्रकच्या चाकाखाली सापडले. ट्रकचा धक्का इतका जोरदार होता की दिलीप पटले यांचा जागीच मृत्यू झाला.

घटनेची माहिती मिळताच पोलीस पाटील गजेंद्र गोसावी यांनी सारंगखेडा पोलिसांशी संपर्क साधला. सहाय्यक पोलीस निरीक्षक रविंद्र बागुल, उपनिरीक्षक किरण बारे यांच्यासह पोलीस पथक घटनास्थळी दाखल झाले. पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला असून उशिरापर्यंत गुन्हा नोंदविण्याचे कामकाज सुरू होते.

या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून, रस्त्याच्या कडेला उभ्या वाहनांमुळे होणाऱ्या अपघातांबाबत नागरिकांनी तीव्र चिंता व्यक्त केली आहे.



## गव्हाण–कोपरच्या आरोग्य केंद्रात महेंद्रशेठ घरत यांच्या हस्ते ध्वजवंदन

**दैनिक वादळ वार्ता**

**उलवे । प्रतिनिधी**

भारताचा ७७ वा प्रजासत्ताक दिन सर्वत्र उत्साहात साजरा करण्यात आला. आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांच्या हस्ते गव्हाण–कोपरच्या आरोग्य केंद्रात ध्वजवंदन करण्यात आले. सकाळी ते शेलघर, रयत शिक्षण संस्थेचे श्री छत्रपती शिवाजी विद्यालय, खारकोपर येथील जिल्हा परिषद शाळा, रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल आदी ठिकाणीही ध्वजवंदनासाठी आवर्जून उपस्थित होते. यावेळी जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थ्यांचा उत्साह वाखाणण्याजोगा होता. यावेळी ध्वजवंदनासाठी पोलिस अधिकाऱ्यांनी महत्त्वाची भूमिका निभावली. त्या त्या शाळांच्या मुख्याध्यापकांनी, शिक्षकांनी ध्वजवंदन उत्तम तयारी केलेली होती.यावेळी माजी खासदार रामशेठ ठाकूर, अरुणशेठ भगत आणि परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्याने उपस्थित होते.



## मनरेगा कंत्राटी कर्मचाऱ्यांचा शासनाविरोधात एल्गार;अक्कलकुव्यात तहसीलदारांना निवेदन



**दैनिक वादळ वार्ता**

**रविंद्र वळवी । मोलगी**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) अंतर्गत कार्यरत कंत्राटी अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांकडे शासनाने दुर्लक्ष केल्याने राज्यभर आंदोलनाला सुरुवात झाली आहे. त्याच पार्श्वभूमीवर अक्कलकुवा तालुक्यातील मनरेगा कर्मचाऱ्यांनी तहसीलदार अक्कलकुवा यांना निवेदन देत शासनाच्या उदासीनतेचा निषेध नोंदविला.तर विविध मागण्यासंदर्भात अक्कलकुवा विधानसभा आमदार आमश्या पाडवी यांना देखील निवेदन सादर करण्यात आले आहे. नियमितीकरण, सेवा–सुरक्षा व समान वेतन या मूलभूत मागण्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असून, १२ जानेवारी २०२६ रोजी दिलेल्या निवेदनानंतरही शासनाने ठोस निर्णय न घेतल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे. (ता.२३) जानेवारी २०२६ पासून राज्यभर काळ्या फिती लावून काम करत ठिय्या आंदोलन करण्यात येत असून, मागण्या मान्य न झाल्यास पुढील टप्प्यात उपोषण व कामबंद आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही कर्मचाऱ्यांनी दिला आहे. परिस्थिती बिघडल्यास त्यास शासन जबाबदार राहील, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

## चिखलीच्या जंगलात वनविभागाचा स्ट्राईक;सागाच्या तस्करीचा डाव उधळला

**दैनिक वादळ वार्ता**

**रविंद्र वळवी । मोलगी**

धडगाव तालुक्यातील बिलगाव वनक्षेत्रात वनविभागाने मोठी कारवाई करत अवैध साग लाकडाची तस्करी उधळून लावली आहे. चिखली शिवारातील जंगल भागात गस्त घालत असताना पथकाने सुमारे २७ हजार ८०३ रुपये किमतीचा सागाचा मुद्देमाल जप्त केला आहे.

दिनांक २६ जानेवारी २०२६ रोजी, प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून एकीकडे देश उत्सव साजरा करत असताना, दुसरीकडे वनविभागाचे पथक सतर्क होते. बिलगाव रेंजमधील माळ परिमंडळांतर्गत येणाऱ्या चिखली (बोरी क. नं. २१८) जंगल परिसरात काही लोक अवैध साग तोड करत असल्याची गुप्त माहिती वनविभागाला मिळाली होती.



मिळालेल्या माहितीनुसार, बिलगाव रेंज स्टाफने जंगल भागात गस्त सुरू केली. यावेळी जंगलात लपवून ठेवलेला सागाचा साठा पथकाच्या नजरेस पडला.

वनविभागाने कारवाईत

साग दांड्या: २८ नग (१.११९ घनमीटर)

किंमत: २४,९११/– रुपये

साग चौपट: ०८ नग (०.१३० घनमीटर)

किंमत: २,८९२/– रुपये

एकूण किंमत: २७,८०३/– रुपये असे साहित्य जप्त केले आहे.

हा सर्व मुद्देमाल वन कर्मचाऱ्यांनी स्वतःच्या खांद्यावर (शिरओझ्याने) मुख्य रस्त्यापर्यंत वाहून आणला आणि त्यानंतर शासकीय व खाजगी वाहनाने धडगाव येथील टिंबर डेपोमध्ये जमा केला.

या प्रकरणी वनरक्षक (बोरी) ज्योती पावरा यांनी भारतीय वन अधिनियम १९२७ चे कलम २६(१) ड, ई, फ अन्वये गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास वनपाल (माळ) प्रतिभा बोरसे करत आहेत.

सदर धडक कारवाई धुळे वनसंरक्षक निनु सोमराज, नंदुरबारचे उपवनसंरक्षक संतोष सस्ते, दक्षता विभागाचे राजेंद्र सदगीर, आणि सहाय्यक वनसंरक्षक एस डी साळुंके यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

या कारवाईचे नेतृत्व वनक्षेत्रपाल लक्ष्मीकांत शेंडगे यांनी केले. पथकात प्रशिक्षणार्थी वनक्षेत्रपाल प्रथमेश ढाणे, वनपाल भरतसिंग परदेशी, मंगेश वळवी, अशोक पावरा, पवन पाडवी, पुनम पावरा, मनिषा पावरा, जोली वळवी आणि वनमजूर भिका पाडवी, दारख्या पटले व शिवाजी पाडवी यांचा समावेश होता.

# मुंबईत इंडिया आर्ट फेस्टिव्हल : समकालीन भारतीय कले चा भव्य कला उत्सव;३० जानेवारी ते १ फेब्रुवारी २०२६

**दैनिक वादळ वार्ता**

**मुंबई । प्रतिनिधी**

समकालीन भारतीय कलाउत्सव 'इंडिया आर्ट फेस्टिव्हल' ३० जानेवारी ते १ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत नेहरू सेंटर, वरळी येथे मुंबईत पुन्हा एकदा दिमाखात भरत आहे. देश–परदेशातील कलावंतांना एकत्र जोडणाऱ्या या महोत्सवात भारतील कलावंतांनी साकारलेल्या वैविध्यपूर्ण कलाकृतींचे दर्शन घडणार आहे.भारतीय कला महोत्सवाची मुंबईतील ही १४ वी, तर देशपातळीवरील ३७ वी आवृत्ती आहे. सर्वसमावेशक अशी विचारप्रणाली म्हणजे स्वतंत्र चित्रकार व कलादालने यांचा एकत्र असा मंच निर्माण करणे हा कला महोत्सवाचा मूळ उद्देश राहिला आहे. त्यामुळे कलाक्षेत्रात गेल्या पंधरा वर्षात इंडिया आर्ट फेस्टिव्हल लोकप्रिय झाला असून व मुंबईतच नव्हे तर दिल्ली, बंगलोर, हैदराबाद आदि शहरांमध्ये देखील कलाक्षेत्रात महोत्सवाचे स्थान अधिक दृढ झाले आहे.३० जानेवारी रोजी सकाळी ११ वाजल्यापासून कला संग्राहक व विशेष आमंत्रितांसाठी प्रदर्शनाचे आयोजित करण्यात आले असून, प्रदर्शन ३१ जानेवारी व १ फेब्रुवारी असे दोन दिवस सर्वसामान्य रसिकांसाठी खुले राहील.या वर्षीच्या कला महोत्सवात ४५ कला दालनं, स्टुडिओज व आर्टिस्ट कलेक्टिवज सहभागी होत असून ५५० कलाकारांच्या ४,५०० हून अधिक कलाकृती तब्बल १५० दालनांमधून सादर केल्या जाणार आहेत. एवढ्या मोठ्या प्रमाणात चित्रकार–शिल्पकार व त्यांच्या कलाकृती एकाच मंचावर पाहण्याची पर्वणी कलाकार, संग्राहक आणि कला रसिकांसाठी आर्ट फेस्टिव्हल दरवर्षी मुंबई, दिल्ली, बंगलोर व हैदराबाद या शहरांमध्ये घेवून येत असतो व कलावंत देखील महोत्सवाची आतुरतेने वाट पाहत असतात..२००८ साली स्थापन केलेल्या इंडिया आर्ट फेस्टिव्हलची संकल्पना ग्रामीण आणि निमशहरी भागांतील कलाकारांना एकत्र व मुक्त व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने मांडण्यात आली होती. कालांतराने हा उपक्रम एका सशक्त राष्ट्रीय कला चळवळीत रूपांतरित झाला असून, मुंबई, दिल्ली, बेंगळुरू आणि हैदराबाद यांसारख्या प्रमुख सांस्कृतिक केंद्रांमध्ये उदयोन्मुख कलाकारांना कलासंग्राहक व रसिकांशी जोडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य तो करीत आहे.याविषयी बोलताना इंडिया आर्ट फेस्टिव्हलचे संस्थापक राजेंद्र पाटील म्हणतात,

इंडिया आर्ट फेस्टिव्हलची संकल्पना ही एक सर्वसमावेशक व्यासपीठ म्हणून करण्यात आली होती. कलाकारांना थेट दर्शकांशी संवाद साधता येईल व आपल्या कलाकृतींना चित्रखरेदीदार वर्गापर्यन्त पोहचविता असा त्यामागे दुहेरी हेतु होता.'मुंबई २०२६ आवृत्तीत सहभागी दालनांमध्ये मुंबई, दिल्ली, बेंगळुरू, हैदराबाद, उदयपूर, शांतिनिकेतन, गोवा, नागपूर व पुणे यांसह देशभरातील कलादालनं, तसेच सिंगापूर, दुबई आणि झ्युरिख (स्वित्झर्लंड) येथील कला दालनांचा आंतरराष्ट्रीय सहभागी पाहायला मिळतो. आर्टिस्ट्स पॅव्हिलियनमध्ये स्वतंत्र कलाकारांची लक्षणीय उपस्थिती दिसून येत असून त्यात ओम थाडकर, अंजली प्रभाकर, राजीव राय, कविता सचदेव, प्रविणा पारेपल्ली, धनश्री वझलवार, अशोक राठोड, कांचन महंते, शुभांगी जांगडे, एम. नारायण, शोभिता हरिहरन, अनिल वर्गीस, अरुल मुरुगन, रिया दास, सीमा गुप्ता, महेश सौंदत्ते, रुता इनामदार, युवराज पाटील, दीपा नाथ, पियाली सरकार, देव मेहता, राहत काझमी, विनीत कुमार, ॲना कुरियन, रुपाली मन्सिंगका, लक्ष्मी सुकुमारन, अंजुम शाह, चांदनी गुलाटी अग्रवाल, उमा कृष्णमूर्ती आदींसह शेकडो कलाकार सहभागी आहेत.गॅलरी सादरीकरणांमध्ये आधुनिक कलेतील दिग्गज आणि समकालीन कलाकारांची प्रभावी सांगड पाहायला मिळेल. यामध्ये एम. एफ. हुसेन, कृष्णेन खन्ना, जोगेन चौधरी, अकबर पदमसी, अंजोली एला मेनन, परेश मैती, मनु पारेख, अतुल दोडिया, टी. वैकुंठम, लालू प्रसाद शॉ, माधवी पारेख, लक्ष्मा गौड, जतिन दास आदींच्या कलाकृतींचा समावेश आहे. यामुळे संग्राहकांना एकाच ठिकाणी नामवंत तसेच उदयोन्मुख कलावंतांच्या कलाकृती एकाच व्यासपीठावर पाहण्याची दुर्मिळ संधी मिळणार आहे.२०२६ मध्ये मुंबईत पुनरागमन करताना, इंडिया आर्ट फेस्टिव्हल भारताच्या विकसित होत असलेल्या कलापरिसंस्थेत एक प्रेरक घटक म्हणून आपली भूमिका पुन्हा अधोरेखित करून, सर्वसमावेशकता आणि सर्जनशील देवाणघेवाणीची परंपरा पुढे नेत आहे.२००८ मध्ये स्थापन झालेला इंडिया आर्ट फेस्टिव्हल आज भारतातील अग्रगण्य समकालीन कला मेळाव्यांपैकी एक मानला जातो. कलाकार, कला दालनं आणि कला संस्थांना एका सर्वसामावेश चौकटीत एकत्र आणत, इंडिया आर्ट फेस्टिवलं ने भारतातील कला प्रदर्शनांची संकल्पनाच नव्याने परिभाषित केली आहे. सर्व स्तरांतील कलाकारांच्या प्रतिभेचा उत्सव साजरा करणारी ही कला चळवळ म्हणजे एक सुलभ आणि सर्वसमावेशक, सार्वजनिक म्हणता येईल अशी कला परिसंस्था आज बनली आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077